राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र.CIC/अ.क्र.६६०१/२०२६

श्री. फारुख दानावाला,
318, एस.व्ही. रोड, पादचारी पुलाजवळ,
आंबोली नाका, अंधेरी (पश्चिम), मुंबई – 400058.

विरुद्ध

जनमाहिती अधिकारी
इमारत व कारखाने विभाग,
'के-पश्चिम' महानगरपालिका प्रभाग,
मुंबई-400058.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
इमारत व कारखाने विभाग,
'के-पश्चिम' महानगरपालिका प्रभाग,
मुंबई-400058.

व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०५.०८.२०२६

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

मूळ अर्जाचा दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक	प्रथम अपीलाचा दिनांक	प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक
१४.०२.२०२२	--	०४.०४.२०२२	--

अपिलार्थीनी दाखल केलेल्या दिनांक १४.०२.२०२२ रोजीच्या जोडपत्रांमध्ये मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी इमारत व कारखाने, के/पश्चिम विभाग यांच्या वतीने अपिलीय अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थीनी अपेक्षिलेली सर्व माहिती ही विनाशुल्क उपलब्ध करून दिली असून त्याचा तपशील विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांच्या लेखी खुलासामध्ये केलेला आहे. उपरोक्त खुलासात माहिती पुरविली असल्याच्या सकारात्मक वक्तव्याची दखल घेत तसेच आज अपिलार्थी सुनावणी दरम्यान गैरहजर असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

आदेश

१. **वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
२. **अपिल क्र.६६०१/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

स्वाक्षरीत/-
(राहुल भा.पांडे)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०५.०८.२०२६